दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ६७ • RNI : MAHMAR/2023/87818 • बुधवार दि.१ जानेवारी २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

## शासकीय वसतीगृहाची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन करावी

# सर्व सोई सुविधा वेळेवर मिळतील याची खात्री करावी-मुख्यमंत्र्यांच्या आढावा बैठकीत सूचना

**मुंबई (वृत्तसंस्था)**
शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांमुळे राज्यातील पात्र निराधारांना दिलासा मिळतो. मात्र निराधारांना लाभ मिळण्यास होणारा विलंब टाळण्यासाठी संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेच्या अर्थसाहाय्याचे वितरण हे थेट लाभ हस्तांतरण (ऊइढ) पोर्टलच्या माध्यमातून लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात वर्ग करण्याची प्रक्रिया तात्काळ सुरू करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे सामाजिक न्याय विभागाच्या पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री फडणवीस यांनी आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ जास्तीत जास्त लाभार्थ्यांना मिळण्यासाठी योजनांच्या सध्याच्या अटी व शर्तींमध्ये सुधारणा करण्यात याव्यात. शासकीय वसतीगृह इमारतींची जिथे आवश्यक असेल तिथे तात्काळ दुरुस्ती करून घेण्यात यावी. वसतीगृहातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सर्व सोई सुविधा वेळेवर मिळतील याची खात्री करावी. तसेच वसतीगृहाची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन करावी. जात पडताळणी प्रक्रिया ऑनलाईन करावी. मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेसाठी पोर्टल लवकरात लवकर सुरू करावे. विभागांतर्गत येणाऱ्या सर्व महामंडळासाठी एक एस.ओ.पी तयार करण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी बैठकीत दिल्या.या बैठकीस आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, पाणीपुरवठा आणि स्वच्छता राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, सहकार राज्यमंत्री डॉ पंकज भोयर, आदिवासी विकास राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव अश्विनी भिडे, प्रधान सचिव संजय खंदारे, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी, सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



## कराडवर मोक्का लावा:संतोष देशमुख हत्या प्रकरणातील तो म्होरक्या-छत्रपती संभाजीराजे

**बीड (वृत्तसंस्था)**
संतोष देशमुख हत्या प्रकरणातील तसेच खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराडने पोलिसांसमोर शरणागती पत्करली आहे. यावर छत्रपती संभाजीराजे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मुख्यमंत्र्यांना भेट घेतल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी लगेच निर्णय होतो. याच्या मागे काही लपले आहे, हा संशोधनाचा भाग आहे. मुख्यमंत्र्यांना मी विनंती करतो की शरण आला म्हणजे गुन्हा संपत नाही. १४ गुन्हे असूनही बॉडी गार्ड घेऊन फिरतो. या सगळ्या आरोपींना मोक्का लावणार असे तुम्ही म्हणाला होता, त्यावर मोक्का लावणे महत्त्वाचे आहे.

संभाजीराजे म्हणाले, खंडणीच्या गुन्ह्यात नोंद केली आणि नंतर बेल घेऊन बाहेर पडणार हा खेळखंडोबा आम्ही सहन करणार नाहीत. तुम्ही मोका कसे लावणार, खुनाचा गुन्हा कसा लावणार यावर मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांनी स्पष्टीकरण द्यावे. धनंजय मुंडे यांना पालकमंत्री करू नये हे देखील मी म्हणालो आहे. तसेच त्यांना पालकमंत्री केले तर मला बीडचे पालकत्व घ्यावे लागेल असे मी म्हणालो आहे. त्यांना मंत्रीपदावरच घ्यायला नको आहे, त्याशिवाय न्याय मिळणार नाही.संभाजीराजे पुढे म्हणाले, धनंजय मुंडे यांना संरक्षण का दिले जाते.



बीडमध्ये कोणालाही जाऊन विचारले की वाल्मीक कराड कोण आहे, सगळे सांगतील हा संतोष देशमुख हत्या प्रकरणातील सात जणांचा म्होरक्या आहे. आणि या म्होरक्यावर कोणाचा आशीर्वाद आहे तर धनंजय मुंडेचा आहे. शरण आला म्हणजे संपले असे नाही, आता खरी जबाबदारी सरकारची वाढली आहे. ते सीडीआर सगळे काढले पाहिजेत, पुण्यात असून यांना माहीत नाही. दोन नगरसेवक त्याच्या सोबत फिरत होते तरी कोणाला समजत नाही म्हणजे हे अपयश आहे.वाल्मीक कराडला मोक्का लावल्याशिवाय आम्ही गप्प बसणार नाही, असा इशारा देखील संभाजीराजे यांनी दिला आहे. इतर सात आरोपी सारखाच हा तितकाच जबाबदार आणि तितकाच त्या खुनशी जोडलेला आहे, असे देखील संभाजीराजे म्हणाले आहेत. खंडणीच्या नावाखाली शरण होणे इथेच हा विषय संपणार नाही. वाल्मीक कराड हा खुनातील आरोपींचा म्होरक्या आहे. १४ गुन्हे असून देखील त्याला संरक्षण देण्यात येत आहे. त्यामुळे त्याच्यावर योग्य तो कलम लागणे गरजेचे आहे.पुढे बोलताना संभाजीराजे म्हणाले, धनंजय मुंडे यांनी काल मुख्यमंत्र्यांची भेट घेतली, त्यांची बैठक झाली आणि बरोबर त्यानंतर हा वाल्मीक कराड शरण येतो. म्हणजे यात काही संबंध आहे का त्यांचा? धनंजय मुंडे यांनी काय चर्चा केली मुख्यमंत्यानसोबत ते देखील आम्हाला समजले पाहिजे. धनंजय मुंडे यांनी चर्चा करून वाल्मीक कराडला सांगितले का की आता शरण हो. विशेष म्हणजे तो पुण्यातच होतो ३ दिवस. अक्कलकोटला स्वामी समर्थांचे दर्शन घेऊन येतो. एवढे सगळे कनेक्शन असताना सीआयडीला पकडता आले नाही? असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला आहे.

## जळगावात वाहनांना कट लागल्याने दोन गट भिडले,५ दुकानांची जाळपोळ

**मुंबई । जळगाव**
दोन वाहनांमध्ये कट लागल्याने पाळधीत दोन गटात बाचाबाची झाली. थोड्याच वेळात या वादाचे पर्यवसान दंगलीत झाले. या दंगलीनंतर काही जणांनी पाच दुकानांची जाळपोळ केली. या वादामुळे पाळधीत दंगलसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. पोलिसांनी रात्री उशिरापर्यंत एका संशयिताला ताब्यात घेतले आहे.

वाहनचालकांच्या वादनंतर हे प्रकरण तेथेच मिटले होते. परंतु थोड्याच वेळात दोन्ही गटातील लोक ग्रामपंचायत चौकात समोरासमोर आल्याने पुन्हा वाद उफाळला. यानंतर झालेल्या हाणामारीत दंगल पसरली. एका गटाने परिसरातील पाच दुकानांची जाळपोळ केली. यामुळे जिल्हा पोलिस अधीक्षकांसह पोलिसांचे पथक पाळधीत दाखल झाले. रात्री उशिरापर्यंत पथकाने या परिसरामध्ये गस्त कायम ठेवली होती. दरम्यान थर्टी फस्ट असल्यामुळे पाळधीसह परिसरात जळगावकरांनी पार्टीसाठी गर्दी केली होती. या घटनेमुळे परिसरामध्ये गोंधळ निर्माण झाला. महामार्गावरील सर्व हॉटेल्स पोलिसांनी तात्काळ बंद केल्या. रात्री उशिरापर्यंत दंगा नियंत्रण पत्रकासह पोलिस कर्मचारी गस्त करीत होते.पाळधी येथील घटनेत भाजीपाला बाजाराच्या जवळील मुख्य रस्त्यावरील तीन ते



चार दुकानांना आग लागली होती. धरणगाव नगरपालिकेचा बंब तसेच जळगाव महानगरपालिकेचा बंब व जैन इरिगेशन कंपनीचे दोन बंब घटनास्थळी पोहोचले. रात्री अंधार असल्याने दुकानांचे कुलूप तोडून आग विझवावी लागल्याचे सांगण्यात आले. चार अग्निशमन बंबाच्या सहा फेऱ्या करण्यात आल्याची माहिती मिळाली.या किरकोळ अपघातात एका मोठ्या राजकारणाची चारचाकी असल्याचा संशय आहे. राजकारणाच्या चारचाकीला साइड न दिल्यामुळे हा वाद उफाळून आल्याचे काही प्रत्यक्षदर्शींचे म्हणणे आहे. मात्र, पोलिस अद्याप या निष्कर्षापर्यंत पोहोचले नसून दोन गटात वाद झाल्याचे कारण पुढे येत आहे.

## दादा, तुम्ही शिवरायांचे पाईक, हे दाखवून दिले; प्राजक्ता माळीनेही दाखवले मोठे मन

**मुंबई (वृत्तसंस्था)**
भाजप आमदार सुरेश धस यांनी सोमवारी माध्यमांसमोर येत अभिनेत्री प्राजक्ता माळीची माफी मागितली होती. यानंतर आता प्राजक्ता माळीनेही प्रतिक्रिया देत सुरेश धस यांच्यावर कुठलीही कारवाई करणार नसल्याचे सांगितले. तसेच दादा, तुम्ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे पाईक आहात, हे दाखवून दिले, असे म्हणत प्राजक्ता माळीने सुरेश धस यांचे कौतुक केले. त्यामुळे प्राजक्ता माळी-सुरेश धस यांच्या वादाचा मुद्दा आता संपुष्टात आला आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणात धनंजय मुंडे यांच्यावर टीका करताना आमदार सुरेश धस यांनी प्राजक्ता माळीचा उल्लेख करत वक्तव्य केले होते. या वक्तव्यावरून प्राजक्ता माळीने पत्रकार परिषद घेत सुरेश धस यांचा समाचार घेतला होता. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महिला आयोगाकडेही तक्रार केली होती. या दरम्यान, सुरेश धस यांनी सोमवारी दिलगिरी व्यक्त करत प्राजक्ता माळीची माफी मागितली.आमदार सुरेश धस यांचे मनापासून आभार मानते. त्यांनी मोठ्या मनाने समस्त



महिला वर्गाची माफी मागितली, दिलगीरी व्यक्त केली. दादा, तुम्ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे पाईक आहात, ही छत्रपतींची भूमी आहे. त्यांचे इथे पुढे चालवले जातील, हे तुम्ही दाखवून दिले, असे प्राजक्ता माळी म्हणाली. तिने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेही आभार मानले. मुख्यमंत्र्यांनी यात जातीने लक्ष घातले आणि अत्यंत संवेदनशीलतेने हा विषय पुढे नेला, मार्गी लावला, असेही ती म्हणाली.कुठलेही आंदोलन, मोर्चा किंवा मोहीम डायव्हर्ट करण्याचा माझा हेतू नव्हता. माझ्या मार्फत कुणा दुसऱ्याचाही हा हेतू नव्हता, असेही स्पष्ट करते. सुरेश धस माझ्याबाबत बोलले नसते, तर आज मला हे सर्व करायची गरज पडली नसती, असे स्पष्टीकरण प्राजक्ता माळीने दिले आहेत त्यामुळे कुणीही त्यातून गैरअर्थ काढू नये, असे आवाहन प्राजक्ता माळीने केले. आमदार सुरेश धस यांनी माफी मागितल्याने मी त्यांच्यावर कोणतीही कायदेशीर कारवाई करणार नाही. माझ्या बाजूने या संपूर्ण प्रकरणावर पडदा टाकते. आम्ही व्यक्त झालो की आमच्यावर टोळ धाड पडते, असे म्हणत प्राजक्ताने खंतही व्यक्त केली आहे.

## नव्या वर्षात घरबसल्या मंत्रालयातील प्रवेशाचा पास पवरून काढता येणार

**मुंबई (वृत्तसंस्था)**
राज्याच्या विविध भागातून दररोज मंत्रालयात हजारो लोक येत असतात. त्यांना मंत्रालयात प्रवेशासाठी पास बंधनकारक आहे. तो मिळवण्यासाठी आणि त्यानंतर प्रवेशासाठी लोकांना दोन ते अडीच तास रांगेत ताटकळत राहावे लागते. तसेच सुरक्षा यंत्रणेवर ही ताण पडतो. मात्र नवीन वर्षात लोकांचा हा त्रास कमी होणार आहे. यासाठी शासनाकडून ‘ डिजी प्रवेश’ नावाचे प तयार करण्यात येत असून, महिनाभरात ही सुविधा सुरू होणार आहे. या पच्या माध्यमातून लोकांना घरबसल्या मंत्रालयाचा प्रवेश पास काढता येणार आहे.

कॅबिनेट बैठकीच्या दिवशी मंत्रालयात येणाऱ्यांचा आकडा ५ हजारावर जातो. दुपारी दोननंतर मंत्रालयात प्रवेश करण्यासाठी खिडकीवरून आधार कार्डच्या आधारे प्रवेश पास दिला जातो. त्यानंतर पोलिसांकडून तपासणी करून मंत्रालयातील गार्डन गेटमधून लोकांना प्रवेश दिला जातो. खिडकीवर पास काढण्यासाठी आणि मंत्रालयात आत जाण्यासाठी दोन्हीकडे साधारण एक ते दीड किमीपर्यंतची रांग लागलेली असते. सुरक्षा




यंत्रणेवरही मोठा ताण पडत आहे. तो पमुळे कमी होईल, असा अधिकाऱ्यांचा दावा आहे. दरम्यान, १ जानेवारी २०२५ पासून मंत्रालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या प्रवेशासाठी एफआरएस प्रणाली (फेशियल रेकग्निशन सिस्टम) सुरू होत आहे. यासाठी मंत्रालयातील प्रत्येक गेटवर साधारण २९ ठिकाणरी फ्लॅप बॅरियर बसविण्यात आले आहेत. डीजी प्रवेश पवर नोंदणीनंतर एक क्रमांक किंवा कोड मिळणार आहे. मंत्रालयात प्रवेशद्वाराजवळ हा कोड अथवा क्रमांक स्कॅन करावा लागणार आहे. त्यानंतर ओळखपत्र दिले जाईल. एफआरएस प्रणालीद्वारे त्या व्यक्तीची ओळख तपासली जाणार आहे. त्यानंतर त्याला प्रवेश दिला जाणार आहे. अशी माहिती मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी दिली.




## अतिवृष्टी व गारपीटचे रखडलेले अनुदान शेतकऱ्यांना तात्काळ द्या

**मुंबई (अमरावती)**
अतिवृष्टी व गारपीटचे रखडलेले अनुदान शेतकऱ्यांना तात्काळ द्या अन्यथा उच्च न्यायालयात याचिका दाखल करू, असा इशारा किसान न्याय हक्क संघर्ष समितीने दिला आहे. वरूड तालुक्यात सन २०२३ मध्ये अतिवृष्टी झाली होती. त्यावेळी शेतकऱ्यांचे खूप नुकसान झाले. परिणामी शासनाने हेक्टरी अनुदान जाहीर केले होते. परंतु त्या अनुदानाची रक्कम अजूनही अप्राप्त आहे.शेतकऱ्यांना शासनाने तीन हेक्टरपर्यंतच्या मर्यादेत अनुदान जाहीर केले होते. परंतु प्रशासनाच्या दिरंगाईमुळे अजूनही अनुदान प्राप्त झाले नाही. दरम्यानच्या काळात एप्रिल २०२४ मधे वरूड तालुक्यात गारपीट झाली. त्यावेळीही शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. शासनाने गारपीटग्रस्तांनाही अनुदान जाहीर केले. परंतु त्यामध्ये प्रशासनाच्या चुकीने पन्नास हजार रुपयांच्यावर मिळणारे अनुदान अडकले आहे.

अनुदानाच्या रकमेसाठी शेतकरी रोज तहसील कार्यालयात हेलपाटे मारत आहेत. तहसील प्रशासन सांगते की काही दिवसात पैसे येणार पण ही निव्वळ शेतकरी यांची दिशाभूल आहे. त्यासाठी आता शेतकरी न्याय हक्क समितीने वरूडचे तहसीलदार, अमरावतीचे जिल्हाधिकारी व शासनाला निवेदन देऊन यावर तोडगा काढून सर्व पात्र उर्वरित शेतकऱ्यांना अतिवृष्टी व गारपीट चे अनुदान द्या, असे निवेदन दिले आहे. यावेळी संघर्ष समितीचे पदाधिकारी सप्नील खांडेकर, तुषार निकम, नरेंद्र उर्फ बबलू पावडे, सुधाकर दोड, बाबाराव मंगुळकर, मोहन खुजे यांच्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित होते.प्रशासनाने अतिवृष्टी व गारपीट हे एकाच आर्थिक वर्षात दाखवले. त्यामुळे शेतकऱ्यांना गारपीटचे अनुदान मिळणार नाही, असे संकेत प्रशासनातील काही अधिकारी यांनी दिले आहे. सध्यस्थितीत अतिवृष्टीचे शिल्लक पात्र शेतकरी ४ हजार ४१४ असून त्यांचे ११ कोटी ५५ लाख ३८ हजार ६०० रुपये व गारपीट २०२४ चे पात्र शेतकरी १०८३ असून त्यांची रक्कम ३४ कोटी २४ लाख ६ हजार ६१२ रुपये आहे.

# नगर मनमाड महामार्गावर खड्ड्यांची समस्या येवला नाका परिसरात तातडीने दुरुस्तीची मागणी





**कोपरगाव । प्रशांत टेके पाटिल**

नगर मनमाड महामार्गाच्या कोपरगाव शहरातील येवला नाका परिसरातील रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. गेल्या काही वर्षांपासून या मार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक असून, खड्ड्यांमुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागतो आहे. विशेषतः नवीन वर्षाच्या तोंडावर या मार्गावरील खड्ड्यांमुळे प्रवाशांच्या सुरक्षा प्रश्नांकित झाले आहेत.

कोपरगाव शहराच्या हद्दीतील एसएसजीएम महाविद्यालयाच्या परिसरात, रोजच विद्यार्थ्यांची वर्दळ असते. याच परिसरात रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले आहेत, तसेच रस्त्याच्या मध्यभागी चाकोऱ्या व फटी पडले आहेत. या खड्ड्यांमुळे विद्यार्थ्यांसह सर्वच नागरिकांना अपघाताचा धोका निर्माण होतो आहे. विशेष म्हणजे, या परिसरात जनावरांसाठी चाऱ्याचा लिलाव होतो, जो रस्त्याच्या कडेला आयोजित केला जातो. या सर्व परिस्थितीमुळे या मार्गावरून प्रवास करणे धोकादायक ठरत आहे.

याबाबत, संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांनी स्थानिक प्रशासनास तातडीने लक्ष घालून या मार्गाच्या दुरुस्तीची मागणी केली आहे. त्यांनी सांगितले की, एसएसजीएम महाविद्यालयाच्या परिसरात विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर वावरतात. त्यामुळे याठिकाणी खड्ड्यांमुळे विद्यार्थ्यांना जीवघेणा धोका निर्माण होतो आहे. वारंवार प्रशासनाला सूचनाही दिल्या आहेत. तरीही प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. बिपीनदादा कोल्हे यांनी पुढे सांगितले की, नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर या मार्गावर तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अन्यथा नागरिक तीव्र आंदोलन करण्यास बाध्य होतील. त्यांनी प्रशासनाला इशारा दिला की, जर या मार्गाची दुरुस्ती तात्काळ केली नाही, तर नागरिक आपला आवाज उठवतील.महामार्गाच्या खड्ड्यांमुळे स्थानिक नागरिक व प्रवासी चिंतेत आहेत. अनेक नागरिकांनी या समस्येवर विचार मांडले असून, सातत्याने होणाऱ्या अपघातांमुळे मोठ्या प्रमाणावर जीवित हानी होण्याचा धोका आहे. प्रशासनाने यावर त्वरित उपाय योजना करून, या मार्गावर वाहतूक सुरळीत करण्यासाठी योग्य पावले उचलावीत, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# श्रीरामपूर नगर पालिका पाणी पुरवठा विभागाचे पाणी पुरवठ्याकडे दुर्लक्ष

## पिण्याच्या पाण्याच्या नळाद्वारे होत आहे चक्क गटारीच्या दुर्गंधीयुक्त पाण्याचा पुरवठा



**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

गोंधवणी रोडवरील सिंधी व पंजाबी कॉलनी तसेच नेहरुनगर परिसरात पिण्याच्या पाण्याच्या नळातून गटारीचे दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. अनेकवेळा नगर पालिका प्रशासनाकडे तक्रारी केल्या गेल्या असतानाही, प्रशासनाच्या उदासीनतेमुळे या गंभीर समस्येवर कोणतीही कार्यवाही होत नसल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

या प्रकारामुळे शहरातील आरोग्यावर मोठा धोका निर्माण होऊ शकतो. गटारीचे पाणी पिण्याच्या पाण्याच्या नळात मिळाल्यामुळे साथीच्या आजारांची संभावना वाढली आहे. नगर पालिकेची उदासीनता स्पष्टपणे दिसत आहे, ज्यामुळे नागरिकांच्या आरोग्याची चिंता वाढली आहे. येत्या काही दिवसांत नगर पालिका गेट समोर उग्र आंदोलन छेडण्याची तयारी सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे. यासाठी बिसलरी पाण्याच्या रिकाम्या बाटल्यांमध्ये गटारीचे पाणी भरून आंदोलन करण्यात येईल, असे सांगण्यात आले आहे.श्रीरामपूर शहरातील इतर सामाजिक कार्यकर्ते आणि संघटनांनीही या समस्येवर लक्ष देऊन नगर पालिकेवर दबाव आणावा अशी परिसरातील नागरिकांची मागणी आहे.

# महाराष्ट्रातील पहिली रोबोटिक मशीन नोबेल हॉस्पिटलमध्ये




**शिरूर । प्रतिनिधी**

नोबेल हॉस्पिटलने डडख मंत्रा ३ रोबोटिक प्रणाली असलेली महाराष्ट्रातील पहिली यंत्रणा स्थापित केली आहे. ही प्रणाली शस्त्रक्रियेतील अचूकता वाढवण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. मराठी अभिनेते प्रसाद ओक यांच्या हस्ते या प्रणालीचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमास नोबेल हॉस्पिटलचे अध्यक्ष डॉ. दिलीप माने, कार्यकारी संचालक डॉ. एच. के. साळे, सतीश मगर आणि इतर वैद्यकीय तज्ज्ञ उपस्थित होते. या प्रणालीत पाच रोबोटिक आर्म्स, ३डी एचडी हेडसेट, आणि ३डी ४के इमेजिंग सुविधा आहेत. हृदयविकार, स्त्रीरोग, मूत्रविकार अशा गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियांसाठी ही यंत्रणा उपयुक्त ठरेल. छोट्या छेदामुळे रुग्ण लवकर बरे होण्याची प्रक्रिया सुलभ होणार आहे.

# संत जनाबाई महाविद्यालय मार्गे G7 साखर कारखान्याची धोकादायक वाहतूक पर्यायी मार्गावर वळवावी

**गंगाखेड । प्रतिनिधी**

संत जनाबाई महाविद्यालय व तहसील कार्यालयाजवळून जाणाऱ्या रस्त्यावरून ऋ७ शुगर साखर कारखान्याची ऊस वाहतूक अत्यंत धोकादायक पद्धतीने केली जात आहे. या रस्त्यावर चढामुळे दोन-दोन ट्रॅक्टर जोडून ट्रॉली ओढली जाते, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या आणि नागरिकांच्या सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. मागील पंधरा दिवसांत या मार्गावर ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॉली पलटी होऊन दोन अपघात झाले आहेत. तसेच, रेल्वे गेटमुळे वाहतूक कोंडीही सातत्याने होते. हा मार्ग विद्यार्थी आणि नागरिकांसाठी अत्यंत गजबजलेला असून भविष्यात मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पर्यायी मार्ग म्हणून इसाद-मासोळी तळ्याच्या खालील रस्ता किंवा सुरळवाडी कॅनल मार्गे कोद्री रोड असा वापर करण्यात यावा, अशी मागणी गंगाखेड तालुका भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सचिव ओंकार पवार यांनी केली आहे. संभाव्य धोका टाळण्यासाठी प्रशासनाने तत्काळ कार्यवाही करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# इंदापूर महाविद्यालयाच्या छात्र सैनिकाची सलग दुसऱ्या वर्षी आर.डी.परेडसाठी निवड

**इंदापूर । प्रतिनिधी**

इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) विभागातील छात्र सैनिक ऋषिकेश शिंदे याची २६ जानेवारी २०२५ रोजी दिल्लीतील राजपथावर होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या आर. डी. २०२५ परेडसाठी निवड झाली आहे.



याआधी, २०२४ साली या महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना विभागातील रुद्रकुमार गवळी याची निवड झाली होती. ऋषिकेश शिंदे याच्या निवडीने महाविद्यालय व त्याच्या कुटुंबात आनंदाचे वातावरण आहे.

राष्ट्रीय सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष व राज्याचे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे, उपप्राचार्य प्रा. दत्तात्रय गोळे यांनी शिंदे याचे अभिनंदन करून त्याला शुभेच्छा दिल्या. आर. डी. परेड ही देशातील सर्वात प्रतिष्ठित कार्यक्रमांपैकी एक मानली जाते, ज्यामध्ये देशभरातील सर्वोत्तम छात्र सैनिक सहभागी होतात. ऋषिकेश शिंदे याच्या यशामागे २ महाराष्ट्र बटालियन, पुणे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सरवदे, आणि एनसीसी विभागप्रमुख लेफ्टनंट दिनेश जगताप यांचे मार्गदर्शन लाभले आहे. महाविद्यालयाच्या सातत्यपूर्ण प्रोत्साहनामुळे आणि मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना उत्कृष्ट संधी मिळत आहेत, याचे हे उदाहरण आहे.

# अनुसूचित जाती शासकीय निवासी शाळा माहागाव येथे सांस्कृतिक कार्यक्रमाची उत्साहात सांगता

**उमरखेड । प्रतिनिधी**

महागाव तालुका : अनुसूचित जाती शासकीय निवासी शाळा, माहागाव येथे वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमाचा उत्साहात समारोप करण्यात आला. या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देत उपस्थितांना आनंददायी अनुभव दिला.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्य, नाटक, गीते, वेशभूषा स्पर्धा आणि पारंपरिक लोककलेच्या सादरीकरणाने उपस्थितांचे लक्ष वेधले. यामुळे संपूर्ण कार्यक्रम आनंदमय वातावरणात पार पडला.

कार्यक्रमास पालक, माजी विद्यार्थी आणि स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. शाळेचे मुख्याध्यापक यांनी आपल्या



भाषणात सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वृद्धिंगत होत असल्याचे मत व्यक्त केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थितांनी शाळेच्या उपक्रमांचे कौतुक करत भविष्यात अशाच उपक्रमांचे आयोजन करण्याची विनंती केली.

शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांचे कलागुण विकसित होण्याबरोबरच त्यांच्यातील नेतृत्वगुण आणि सामाजिक जाणिवा वाढीस लागतील, अशी आशा शाळेच्या व्यवस्थापनाने व्यक्त केली.

# २० वर्षांनंतर दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा संपन्न

**वरोरा । प्रतिनिधी**

भारत भूषण मालवीय माध्यमिक विद्यालय, नगर परिषद वरोरा येथे २००३-०४ च्या माध्यमिक विद्यार्थ्यांनी २० वर्षांनंतर एकत्र येत शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. स्नेह मेळावा २६ डिसेंबर २०२४ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षपद मुख्याध्यापिका प्रतिमा पुरी यांनी भूषवले, तर प्रमुख पाहुणे म्हणून विशाल साटोणे, भास्कर ठमके, चंद्रभान शहारे, ओमप्रकाश निमेकर, विजया राऊत आणि इतर शिक्षक उपस्थित होते. दीपप्रज्वलन आणि थोरपुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.यावेळी शिक्षकांचा शाल, पेन, व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.तसेच दिवंगत मित्रांना व शहीद सैनिक अक्षय निकुरे यांना श्रद्धांजली



वाहण्यात आली.शिक्षकांनी व माजी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत आपली मनोगते व्यक्त केली. मेळाव्याच्या निमित्ताने माजी विद्यार्थ्यांनी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. मेळाव्याच्या खर्चासाठी विद्यार्थ्यांनी स्वतः रक्कम जमा केली. स्नेहभोजनाने कार्यक्रम अधिक संस्मरणीय झाला.कार्यक्रमात राखी पातालबंशी यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रास्ताविक सुषमा क्षीरसागर आणि आभार प्रदर्शन रमेश जायनाकर यांनी केले. माजी विद्यार्थ्यांमध्ये राहील शेख, रीदा शेख, रमेश जायनाकर,

सचिन ठमके,वीणा चौधरी,सुषमा क्षीरसागर यांच्यासह अनेकजण उपस्थित होते. हा मेळावा माजी विद्यार्थ्यांसाठी जुने संबंध ताजे करणारा व भावनिक अनुभव ठरला.

## विधी अधिकारी पदाकरिता अर्ज आमंत्रित

# १० जानेवारीपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयान्वये, दि. ६ एप्रिल २०११ व समक्रमांकाचे निर्णय दि. ३० जुलै २०११ मधील तरतुदीनुसार 'विधी अधिकारी' हे पद कंत्राटी पद्धतीने एकावेळी ११ महिन्याच्या कालावधीसाठी भरावयाचे आहे. त्याकरिता, पात्र उमेदवारांकडून १० जानेवारी २०२५ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे.

**शैक्षणिक अहर्ता व अनुभव:**उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर असावा तसेच तो सनद धारक असावा. विधी अधिकारी या पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान ७ वर्षाचा अनुभव आवश्यक आहे. उमेदवार महसूल, सेवाविषयक तसेच प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती व विभागीय चौकशी आदीबाबत ज्ञानसंपन्न असेल. ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो सक्षमतेने पार पाडू शकेल. विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीच्या वेळी ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे. सदर पदाकरिता एकत्रित मानधन रु. ३० हजार असून दुरध्वनी व प्रवास खर्च रु. ५ हजार असे एकत्रित मानधन रुपये ३५ हजार प्रति महिना देय राहील. या व्यतिरीक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही. महसूल विभागाच्या शासन निर्णयानुसार, विधी अधिकारी यांची निवड जिल्हा निवड समितीच्या अखत्यारित राहील. विधी अधिकारी हे पद नियमित स्वरूपात ११ महिन्याकरिता कंत्राटी तत्वावर भरण्यात येईल. विधी अधिकारी (कंत्राटी) या पदाकरिता अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांवर फौजदारी तसेच कोणताही गुन्हा नोंद नसावा. विधी अधिकारी यांचे काम असमाधानकारक असल्याचे निष्पन्न झाल्यास किंवा त्यांचे विरुद्ध तक्रार प्राप्त झाल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची तात्पुरत्या स्वरूपातील नेमणूक रद्द करण्यात येईल. तसेच विधी अधिकारी म्हणून निवड झाल्यानंतर इतर खाजगी कामे करता येणार नाही.

**पदभरतीबाबत कार्यक्रम :**सदर पदाकरिता अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख १० जानेवारी २०२५ असून पात्र व अपात्र उमेदवारांची यादी १४ जानेवारी २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. प्रसिद्ध केलेल्या यादीमधील चुकीबाबत उमेदवारांनी कार्यालयामध्ये समक्ष लेखी अर्ज करण्याची १६ जानेवारी २०२५ ही अंतिम तारीख असेल. तर झालेल्या चुकांची दुरुस्ती करून पात्र-अपात्र उमेदवारांची यादी १७ जानेवारी २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. उमेदवारांची प्राविण्य पडताळणीसाठी लेखी चाचणी, प्रत्यक्ष मुलाखत अथवा दोन्ही घेण्याची सूचना दि. २० जानेवारी २०२५ रोजी कार्यालयाच्या सूचना फलकावर तसेच संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

उमेदवारांनी शैक्षणिक पात्रतेची सर्व कागदपत्रे, प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती, अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. सदर जाहिरात व विहित नमुन्यातील अर्ज, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र कार्यालयाच्या https://chandrapur.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्ज जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर या पत्त्यावर दि. १० जानेवारी २०२५ पर्यंत सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत पाठवावेत. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. या प्रक्रियेमध्ये बदल करण्याचा, स्थगित, रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, चंद्रपूर यांना राहील.

# गरजू विद्यार्थ्यांना ग्रामविकास फाउंडेशनकडून स्वेटर वाटप



**पाटस । ता. दौंड**

येथील रयत शिक्षण संस्थेच्या नागेश्वर विद्यालय व कै. मधुकरराव गंगाजीराव शितोळे उच्च माध्यमिक विद्यालयात, आज (३१ डिसेंबर २०२४) ग्रामविकास फाउंडेशनच्या वतीने गरजू विद्यार्थ्यांना स्वेटर वाटप करण्यात आले. कडाक्याच्या थंडीत गरज लक्षात घेऊन शाळा प्रशासनाने फाउंडेशनकडे मागणी केली होती, त्यानुसार विद्यार्थ्यांना उबदार स्वेटर पुरवण्यात आले.

ग्रामविकास फाउंडेशनने यापूर्वीही शालेय साहित्य जसे की पुस्तके, स्कूल बॅग यांचे वाटप केले आहे.

कार्यक्रमाला शाळेचे प्राचार्य भोसले सर, फाउंडेशनचे संस्थापक विनोद कुरुमकर, मार्गदर्शक जुनेद तांबोळी, अध्यक्ष गणेश जाधव, उपाध्यक्ष गौतम पानसरे, सचिव गणेश शितोळे, कार्याध्यक्ष राज मुलाणी, सहकार्याध्यक्ष रिजवान शेख तसेच पाटस व्यापारी संस्थेचे अध्यक्ष राजू गोसावी, उपाध्यक्ष विठ्ठल वाळुंजकर, सचिव नानासाहेब म्हस्के आणि शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे गरजू विद्यार्थ्यांना थंडीत दिलासा मिळाला असून फाउंडेशनच्या सामाजिक कार्याचे कौतुक होत आहे.

# आ.किशोर जोरगेवार मित्र परिवारच्या वतीने निशुल्क चष्मे वाटप कार्यक्रमाचे आयोजन

## ३०० नागरिकांना मोफत चष्मे वाटप



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आमदार किशोर जोरगेवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित आरोग्य शिबिरात डोळे तपासणी केलेल्या नागरिकांना आज आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते निशुल्क चष्मे वाटप करण्यात आले. यावेळी जवळपास ३०० नागरिकांना लाभ घेतला. आमदार किशोर जोरगेवार मित्र परिवाराच्या वतीने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

आमदार किशोर जोरगेवार यांच्या कार्यालयात आयोजित या कार्यक्रमाला भारतीय जनता पक्षाचे माजी नगरसेवक सुभाष कासनगोट्टूवार, माजी नगरसेविका शिला चव्हाण, माया उईके, कल्पना शिंदे, राशिद हुसेन, सुमित बेले, पंकज बेले, नकुल वासमवार, विश्वजित शहा आदींची प्रमुख उपस्थिती होती.

१७ डिसेंबरला भारतीय जनता पक्षाचे आमदार किशोर जोरगेवार यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तुकुम येथेही आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रक्तदान शिबिर आणि डोळे तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात जवळपास ५०० हून अधिक नागरिकांची तपासणी करण्यात आली. तसेच यावेळी आयोजित रक्तदान शिबिरात शेकडो युवकांनी रक्तदान केले.

दरम्यान, आज आमदार किशोर जोरगेवार यांच्या कार्यालयात सदर शिबिरात डोळे तपासणी करण्यात आलेल्या पात्र नागरिकांना चष्मे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात बोलताना आमदार किशोर जोरगेवार म्हणाले की, हा कार्यक्रम केवळ चष्मे वाटप करण्यापुरता मर्यादित नाही, तर आपल्या समाजाच्या आरोग्य आणि कल्याणासाठी एक महत्त्वाचा उपक्रम आहे. डोळे आपल्या शरीराचा अत्यंत महत्त्वाचा अवयव आहेत. दृष्टी चांगली असेल, तर आपले जीवन अधिक चांगल्या पद्धतीने घडवता येते. त्यामुळे, या कार्यक्रमाच्या माध्यमातून ज्यांना आर्थिक परिस्थितीमुळे चष्मे घेणे शक्य नव्हते, त्यांना मदत करण्याच्या भावनेतून हा उपक्रम आयोजित करण्यात आला असल्याचे ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमात जवळपास ३०० नागरिकांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले

# रुद्रा स्पोर्ट्स व सोहम किंग्स संघ फायनल मध्ये दाखल

## स्व.माजी आमदार माधवरावजी नि-हाळी करंडक




**पाथर्डी । प्रतिनिधी**

पाथर्डी तालुका टी-२० क्रिकेट असोसिएशन, एस.व्ही.नेट व मा.प्रतापकाका ढाकणे मित्र मंडळ यांनी आयोजित केलेल्या स्व.माजी आमदार माधवरावजी नि-हाळी करंडक पाथर्डी प्रिमियर लिग पर्व ४ मध्ये काल झालेल्या सेमिफायनल १ मध्ये दहिफळे इलेक्ट्रिकल्स रुद्रा स्पोर्ट्स संघाने पावन गणपती धमाका क्लब संघावर विजय मिळवला. दहिफळे इलेक्ट्रिकल्स संघाने नाणेफेकीत विजय मिळवून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पावन गणपती संघाने २० षटकात १८३ धावांचे तगडे आव्हान उभे केले. हर्षद डोमकवळे ६५ आणि रोहित माने ४२ धावा करून संघाचे नेतृत्व केले. दहिफळे संघाकडून प्रणव सोनटक्के व व्यंकटेश नावगिरे यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. पावन गणपती संघाकडून गोलंदाजीत अमजद पठाण व हर्षद डोमकवळे यांनी प्रत्येकी १ बळी मिळवला. १८३ धावांचे लक्ष्य घेऊन मैदानात उतरलेल्या दहिफळे संघाकडून असिफ पठाण ७२ धावा आणि आकाश वाघमारे ७० धावा करून संघाला विजय मिळवून दिला. दहिफळे इलेक्ट्रिकल्स संघाने अवघ्या १४ षटकात १८३ धावांचे बलाढ्य लक्ष्य पार करत सेमीफायनल सामन्यात विजय मिळवला. सामनावीर पुरस्कार आकाश वाघमारे याला देण्यात आला. दुसऱ्या सेमिफायनल सामन्यात सोहम किंग्स संघाने दराडे आर्टस् संघावर ६२ धावांनी विजय मिळवला. दराडे आर्टस् संघाने नाणेफेकीत विजय मिळवून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सोहम किंग्स संघाने २० षटकांत २१४ धावा केल्या. नितीश नि-हाळी याने ७७ चेंडूत ११२ धावा करून शातकीय खेळी केली, तर अभिजीत काळे याने ३३ धावा केल्या. गोलंदाजीत दराडे आर्टस् संघाकडून रुद्रा खेडकर ३ आणि व्यंकटेश ढाकणे २ बळी घेतले. २१४ धावांचे लक्ष्य घेऊन मैदानात उतरलेल्या दराडे आर्टस् संघाने १५२ धावांवर सिमटला. आदेश ३५ आणि मोरे व प्रथमेश शिरसाट यांनी प्रत्येकी २७ धावा केल्या. गोलंदाजीत सोहम किंग्स संघाकडून तारा जोशी यांनी ४ बळी घेतले. नितीश नि-हाळी व आकाश चितेळे यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.सामनावीर पुरस्कार नितीश नि-हाळी याला अमोल शिंदे व दत्ता सोनटक्के यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.आज होणारा फायनल सामना सोहम किंग्स विरुद्ध दहिफळे इलेक्ट्रिकल्स व रुद्रा स्पोर्ट्स यांच्यात ११ वाजता सुरू होईल. पाथर्डीतील क्रिकेट प्रेमींनी या सामन्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन संयोजक आतिष नि-हाळी यांनी केले आहे.

# विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट) परिवाराचे स्नेहमिलन थाटात संपन्न

## भद्रावती येथील विवेकानंद महाविद्यालयात केले होते आयोजन







**भद्रावती । प्रतिनिधी**

विदर्भात शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट), वरोरा या शैक्षणिक संस्थेतंर्गत येणाऱ्या विविध शाळा महाविद्यालयात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांचा स्नेहमिलन सोहळा स्थानिक विवेकानंद महाविद्यालयातील श्री अरविंद सभागृहात आयोजित करण्यात आला . दिनांक २८ डिसेंबर रोज शनिवारी झालेल्या या स्नेहमिलन सोहळ्यास विवेकानंद ज्ञानपीठांतर्गत येणाऱ्या विविध शाळा महाविद्यालयातील कार्यरत कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. या शैक्षणिक संस्थांमध्ये कार्यरत कर्मचारीवर्गाची परस्परात ओळख निर्माण होऊन स्नेह वृद्धिगत व्हावा. परस्परांच्या कार्याचा परिचय व्हावा. कर्मचाऱ्यांमध्ये ऋणानुबंध वृद्धिंगत व्हावे. त्यातून संस्थेच्या कार्याला बळकटी येऊन संस्थेची भरभराट व्हावी या उद्देशाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट), वरोराचे अध्यक्ष पुरुषोत्तम स्वान होते. प्रमुख उपस्थितीत सचिव अमन टेमुर्डे, उपाध्यक्ष जयंत टेमुर्डे, सहसचिव राजू गावंडे, सदस्य सर्वश्री झेड. बी. लांबट, विजय गावंडे, मायाताई राजूरकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या सोहळ्यात विवेकानंद माध्यमिक विद्यालय वरोरा, विवेकानंद पूर्व प्राथमिक शाळा वरोरा, विवेकानंद उच्च प्राथमिक शाळा वरोरा, अरविंद विद्यानिकेतन हायस्कूल वरोरा, विवेकानंद माध्यमिक विद्यालय मांगली, विवेकानंद माध्यमिक विद्यालय साठगांव, विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय भद्रावती, विवेकानंद माध्यमिक विद्यालय भद्रावती, विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय भद्रावती येथील कार्यरत कर्मचारीवृंद मोठ्या संख्येने सहभागी झाले. विवेकानंद महाविद्यालयातील श्री अरविंद सभागृहात आयोजित या भव्य सोहळयास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केल्यानंतर विवेकानंद ज्ञानपीठातील सर्व कर्मचारीवृंदांनी आपला परिचय देत आपले व्यक्तिमत्व व सुप्त कलागुणांना वाव दिला. पीपीटीद्वारे आपल्या शाळा महाविद्यालयातील उपक्रमांची सविस्तर माहिती आदानप्रदान केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.ज्योती राखुंडे, आभारप्रदर्शन प्रा. नरेंद्र लांबट यांनी केले. या सोहळ्याच्या यशस्वितेसाठी आयोजन समितीने प्रचंड परीश्रम घेतले.

# अहिल्यानगर रेल्वेमार्गाच्या सर्व्हेक्षणास मंजुरी: कनेक्टिव्हिटी वाढणार




**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर येथील रेल्वे मार्गाच्या बहुप्रतिक्षित सर्व्हेक्षणास रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मान्यता दिली आहे. याशिवाय, साईनगर (शिर्डी) ते पुणतांबा आणि साईनगर (शिर्डी) ते नाशिक या थेट रेल्वे मार्गांसाठीही मंजुरी देण्यात आली आहे.

नाशिक - साईनगर शिर्डी (८२ किलोमीटर), पुणे - अहिल्यानगर (१२५ किलोमीटर) आणि साईनगर शिर्डी - पुणतांबा (१७ किलोमीटर) या तीन रेल्वे प्रकल्पांसाठी सर्वेक्षणास मान्यता मिळाली आहे. या सर्वेक्षणानंतर डीपीआर तयार करण्यात येईल.

पुणे आणि नाशिक यांच्या थेट जोडणीसाठी डीपीआर महाराष्ट्र रेल्वे पायाभूत सुविधा विकास महामंडळाने तयार केला आहे. महाराष्ट्र सरकार ५० टक्के आणि रेल्वे मंत्रालय ५० टक्के यांचा संयुक्त उपक्रम असल्याचे रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत सांगितले. या रेल्वेमार्गामुळे प्रवाशांचा वेळ वाचेल आणि शिरूर व शिक्रापूरमधील मोठ्या वाहतूक कोंडीपासून सुटका होईल. तसेच, या कनेक्टिव्हिटीमुळे विकासाला चालना मिळणार आहे.

अहिल्यानगर शहर, पुणे आणि नाशिक यांच्यातील रेल्वे कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी दौंड-मनमाड मार्गाच्या दुहेरीकरणासही मान्यता देण्यात आली आहे. या २४८ किलोमीटर लांबीच्या मार्गापैकी १७८ किलोमीटरचे दुहेरीकरण पूर्ण झाले आहे, तर उर्वरित ७० किलोमीटरचे काम प्रगतीपथावर आहे.

# संजय सहारे यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार




**पुलगाव । प्रतिनिधी**

३१ डिसेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार ५८ वर्षे पूर्ण होऊन व तब्बल ३३ वर्षांच्या सेवेनंतर संस्थेचे प्राचार्य संजय कृष्णराव सहारे यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. या समारंभाचे अध्यक्षत्व शाळेचे मुख्य समन्वयक नुरसिंग जाधव यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रसंगी उपमुख्याध्यापक गणेशराव इंगळे, पर्यवेक्षिका श्रीमती माया वंडलकर, उपप्राचार्य सुनील भोयर, पर्यवेक्षक आनंद जीवने, सत्कारमूर्ती संजय सहारे, त्यांची पत्नी चंचला सहारे, तसेच त्यांची दोन्ही मुले उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात शारदा पूजन आणि संस्थेचे संस्थापक स्वर्गीय रंगलालजी केजरीवाल यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून झाली.

मंचावर उपस्थित सर्व प्रमुख पाहुण्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच, संजय सहारे यांचा शाल, श्रीफळ आणि भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला, आणि त्यांची पत्नी चंचला सहारे यांना साडी देऊन सत्कार केला. आर. के. कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने अध्यक्ष सुबोध चचाने व सचिव रणजीत धोटे यांनी भेटवस्तू प्रदान केली.

कार्यक्रमात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने विनोद माहुरे, पूर्व माध्यमिक विभागातील सुनिल मेश्राम, माध्यमिक विभागातील कु. नीलिमा घिनमिने, आणि कनिष्ठ महाविद्यालयातील रणजीत धोटे यांनी संजय सहारे यांच्या संस्थेला दिलेल्या योगदानाबद्दल मनोगत व्यक्त केले.

यानंतर, पर्यवेक्षिका माया वंडलकर, पर्यवेक्षक आनंद जीवने, उपप्राचार्य सुनिल भोयर, उपमुख्याध्यापक इंगळे, संजय सहारे यांच्या पत्नी चंचला सहारे आणि त्यांच्या मुलांनी आपले विचार व्यक्त केले. संजय सहारे यांनी संस्थेने केलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष नुरसिंग जाधव यांनी संजय सहारे यांच्या अथक योगदानाबद्दल प्रशंसा केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. रिद्धी भांडे यांनी केले, आणि आभार प्रदर्शन रसिका ओक यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उच्च माध्यमिक विभागातील सांस्कृतिक विभागाचे सर्व कर्मचारी तसेच शिपाई यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाच्या समारोपानंतर, आर. के. कर्मचारी सहकारी पतसंस्थेद्वारा स्वरूची भोजनाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात संस्थेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# जनावरांच्या बाजारात मंदीचे सावट;दुधाच्या दरातील घसरगुंडीचा शेतकऱ्यांना फटका

**मोहोळ । प्रतिनिधी**

दुधाचे दर कमी झाल्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील सांगोला, मोडनिंब आणि सोलापूर येथील आठवडे बाजारात जनावरांच्या खरेदी-विक्रीवर मोठा परिणाम झाला आहे. संकरित दुभत्या गायींचे दर प्रचंड घसरले असून, शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.

दुभत्या संकरित गायींच्या दरात मोठी घट झाली आहे, तर दुभत्या म्हशींचे दर तेजीत आहेत. गाभण म्हशीला ७० हजारांपासून १ लाख ४० हजार रुपयांपर्यंतचा दर मिळतो, तर संकरित दुभती गाय २० ते ७० हजारांत विकली जात आहे.

शेतकऱ्यांकडून लहान ट्रॅक्टरचा वापर वाढल्याने लाखोंची बैलजोडी आता ६० हजारांत मिळू लागली आहे. खिलार बैलजोडीला ३० हजारांपासून १ लाख ३० हजार रुपयांपर्यंत दर मिळत आहेत.



सांगोला, मोडनिंब, सोलापूर येथील आठवडे बाजारात दोन ते साडेतीन हजार जनावरांची खरेदी-विक्री होते. यामुळे कृषी उत्पन्न बाजार समितीला लाखो रुपयांचा महसूल मिळतो. परंतु, सध्या जनावरांच्या बाजारातील दरातील अस्थिरतेमुळे शेतकऱ्यांबरोबरच व्यापारीही अडचणीत आले आहेत.सांगोला आणि सोलापूरच्या बाजारपेठांमध्ये पारदर्शक व्यवहारामुळे कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेशातील व्यापारी जातिवंत बैलजोड्या, गायी आणि म्हशी खरेदीसाठी येतात. मात्र, जनावरे परराज्यातून आणण्यासाठी वाढलेले खर्च आणि विक्रीतील घटीमुळे ताळमेळ बसत नाही.दुधाचे दर कमी झाल्याने शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसायात मोठा तोटा सहन करावा लागत आहे. संकरित गायींचे दर घटल्यामुळे विक्रीतून होणारे उत्पन्न कमी झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या अर्थकारणावर गंभीर परिणाम झाला आहे.सध्याची परिस्थिती सुधारण्यासाठी दुग्ध व्यवसाय आणि जनावरांच्या बाजारपेठेसाठी धोरणात्मक उपायांची गरज आहे, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# सट्टापट्टी जोमात, पोलीस प्रशासन कोमात

## मुख्य बस स्थानक परिसरात खुलेआम चालणाऱ्या सट्टापट्टीला आशीर्वाद कोणाचा?

**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील शेगाव बु गावात सध्या अवैध धंद्यांची झपाटलेली वाढ होत आहे. अवैध व्यवसायांना लगाम घालण्याऐवजी पोलीस प्रशासन मात्र त्यावर पूर्णपणे डोळेझाक करत असल्याचे दिसून येत आहे. विशेषतः, बस स्थानक चौकातील खुलेआम सट्टापट्टी व्यवसायाची सुरूवात झाली आहे, आणि हे सट्टापट्टी राजरोसपणे चालवले जात असताना पोलीस प्रशासन मात्र या बाबतीत गप्प बसले आहे.

अदृश्यपणे सुरू असलेल्या या सट्टापट्टी व्यवसायावर पोलीस प्रशासन कारवाई का करत नाही, असा सवाल आता सामान्य नागरिकांकडून विचारला जात आहे. या व्यवसायात पोलीस प्रशासनाचे कोणते तरी हितसंबंध जडले आहेत का, अशी शंका स्थानिक नागरिकांच्या मनात निर्माण झाली आहे. पोलीस प्रशासन या व्यवसायावर कारवाई करण्याऐवजी डोळेझाक करत असल्यामुळे, नागरिकांची निराशा दिसून येत आहे. सट्टापट्टीचा अवैध व्यवसाय जोमात असताना, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे स्थानिक जनतेला अनेक प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे.

# शालेय वर्षीय स्नेहमिलन उत्साह, प्रेरणा आणि संधींचा मंच-आ.किशोर जोरगेवार

## प्रियदर्शनी कन्या विद्यालयात वार्षिक स्नेहमिलन कार्यक्रमाचे आयोजन

शाळेचा वार्षिक स्नेहमिलन कार्यक्रम म्हणजे एक अविस्मरणीय क्षण आहे, जिथे विद्यार्थी आपल्या कला, कौशल्य आणि क्रीडाप्रेमाचे दर्शन घडवतात. शाळा ही केवळ शिक्षणाचे मंदिर नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे. आजच्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमधील मेहनत आणि आत्मविश्वास दिसून आला असून शालेय वर्षीय स्नेहमिलन कार्यक्रम हा विद्यार्थ्यांसाठी उत्साह, प्रेरणा आणि संधींचा मंच असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.



समता शिक्षण विकास महामंडळ, चंद्रपूर द्वारा संचालित प्रियदर्शनी कन्या विद्यालयात वार्षिक स्नेहमिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी समता शिक्षण विकास महामंडळाच्या अध्यक्षा तारा पोटदुखे, समाजसेवक नंदू अग्रवाल, प्रभाकर झुनघटे, मंगला धोपटे, रजनी अल्लुरवार, मेघा कामडी, अर्चना झुनघटे, ज्ञानेश्वर साटोने, मुख्याध्यापिका वैशाली भलमे, सलीम शेख, नकुल वासमवार आदींची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, शिक्षण क्षेत्रात काम करण्याची आपली भूमिका राहिली आहे. परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही, या दिशेने आपण काम करत आहोत. अनेक विद्यार्थ्यांना शाळेत यायचे साधन नसल्याचे लक्षात येताच आपण मुलींना दोन हजार सायकलींचे वितरण केले. तर माझ्या वाढदिवसानिमित्त ५०० विद्यार्थ्यांना प्रत्येकी ६ असे ९००० वह्यांचे वितरण करण्यात आले. पुढेही विद्यार्थ्यांसाठी असे शिक्षणोपयोगी उपक्रम राबविणार असल्याचे ते यावेळी बोलत होते.शाळेत मिळणारे शिक्षण, मूल्ये आणि संस्कार यामुळेच विद्यार्थी उज्ज्वल भविष्यासाठी तयार होतात. शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे आणि पालकांच्या पाठिंब्यामुळे येथील मुले शिक्षण, क्रीडा, कला आणि विज्ञान या सर्व क्षेत्रांत यशस्वी होत आहेत. विद्यार्थ्यांनी स्वप्ने मोठी ठेवत त्यांची पूर्तता करण्यासाठी सातत्याने मेहनत करावी. शिक्षण, शिस्त आणि प्रामाणिकपणा या तीन गोष्टी आयुष्यभर यशाकडे नेतील. लोकप्रतिनिधी म्हणून शाळेच्या प्रगतीसाठी आणि विद्यार्थ्यांच्या विकासासाठी आवश्यक ते सहकार्य राहणार असल्याचे ते यावेळी बोलत होते. या कार्यक्रमाला शिक्षकवृंद, पालकवर्ग आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती

# धनंजय मुंडेच्या समर्थनार्थ ओबीसी नेते मैदानात उतरले

**बीड (प्रतिनिधी):** संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराड हाच प्रमुख सूत्रधार असल्याचा आरोप आमदार सुरेश धस यांनी केल्यानंतर राज्याच्या राजकारणाला वेग आलाय. वाल्मिक कराड हा मंत्री धनंजय मुंडेंचा माणूस असल्याची दावा विरोधी पक्ष करत असल्याने त्यांच्या राजिनाम्याची मागणी जोर धरू लागली आहे. तर दुसरीकडे मंत्री धनंजय मुंडे यांच्या समर्थनार्थ आता ओबीसी नेते देखील उतरताना दिसून येत आहेत. सुरेश धस यांनी केलेल्या वक्तव्यांनंतर राज्यातील राजकारणाला वेग आला आहे.मंत्री धनंजय मुंडे यांच्या समर्थनार्थ आता ओबीसी नेते देखील उतरताना दिसून येत आहेत.संतोष देशमुख यांची झालेली हत्या ही अतिशय दुर्दैवी आहे या हत्येचा मी जाहीर निषेध करतो या प्रकरणातील आरोपीला कठोर शासन करावे त्याला फाशीही द्यावी. मात्र संतोष देशमुख यांच्या आडून जे काही चाललं आहे. हे हत्या प्रकरण बाजूला ठेवून राजकीय पोळी भाजण्याचे काम सुरू आहे. यामध्ये ओबीसीच्या नेत्याला टार्गेट केल जात आहे. धनंजय मुंडे,पंकजा मुंडे यांचे जाणीवपूर्वक राजीनामे मागितले जात आहेत. म्हणून मी त्यांच्या पाठीशी पालक म्हणून खंबीरपणे उभा राहत आहे. यामध्ये जाणीवपूर्वक एका जातीला ओबीसी समाजाला बदनाम करणं चुकीचे असल्याचे ओबीसी नेते प्रा.टीपी मुंडे म्हणाले आहेत. तर दुसरीकडे भाजप आमदार सुरेश धस हे सध्या बीड जिल्हाधिकारी कार्यालयात आहेत. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची भेट घेतायत. जिल्हाधिकारी पाठक हे जवळपास एक महिना प्रशिक्षणासाठी गेले होते. त्यानंतर ते आजच रुजू झालेत. जिल्हाधिकारी रुजू झाल्यानंतर आमदार सुरेश धस भेटीसाठी पोहोचले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालय समोर चार वेगवेगळे आंदोलनं, उपोषणं सुरु आहेत.आज वाल्मीक कराड यांच्यावरील खोटे गुन्हे मागे घ्या यासाठी देखील एका महिलेने आंदोलन सुरू केलय. ३ दिवसांपासून सरपंच संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी उपोषण केले जातेय. तिसरे आंदोलन शहरातील शस्त्र परवाने तपासून रद्द करण्यासाठी अंजली दमानिया आंदोलन करत आहेत.

# अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक आणि अहमदनगर स्टाफ स्पोर्ट्स अँड रिक्रिएशन असोसिएशन टेनिस बॉल स्पर्धा संपन्न

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड आणि अहमदनगर स्टाफ स्पोर्ट्स अँड रिक्रिएशन असोसिएशन यांनी आयोजित केलेल्या बँक सेवकांची टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा सन २०२४-२५ बुवाजी आव्हाड महाविद्यालय, पाथर्डी येथे पार पडली. स्पर्धेत संगमनेर तालुका संघाने विजेतेपद मिळवले, तर अहमदनगर तालुका संघ उपविजेता ठरला. बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डिले यांच्या हस्ते बक्षीस वितरण समारंभ पार पडला. पाथर्डी तालुक्याचे आमदार आणि बँकेच्या संचालिका मोनिका राजळे यांच्या उपस्थितीत हा समारंभ झाला. उपस्थित मान्यवरांनी विजयी संघाचे अभिनंदन केले तसेच इतर सहभागी संघांचेही कौतुक केले.



हे स्पर्धेचे तिसरे वर्ष होते आणि यावर्षी स्पर्धेचे आयोजन पाथर्डी तालुक्याने उत्कृष्टरीत्या केले.
विजयी संघाचे अभिनंदन बँकेचे व्हाईस चेअरमन माधवराव कानवडे आणि संचालक गणपतराव सांगळे यांनी केले. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रावसाहेब वर्पे यांनीही विजयी संघाचे कौतुक केले.
विजयी संघामध्ये कर्णधार मनोजकुमार जेडगुले, अनिल नवले, महेश कर्पे, सचिन गोडे, डी. एम. पुरी, चेतन देशमुख, प्रशांत आग्रे, वैभव कहांडळ, आनंदसिंग परदेसी, गणेश गोसावी आणि योगेश गांगुर्डे यांचा समावेश होता. संघ निवडीमध्ये तालुका विकास अधिकारी अशोक थोरात यांनी महत्त्वपूर्ण भूमिका निभावली.

# रायगावजवळ एसटी बस पलटी;करमाळा उपजिल्हा रुग्णालयात जखमींना भेट

## करमाळा डेपोच्या एसटी बसेसच्या खराब स्थितीवर नातेवाईकांची तक्रार

**सोलापूर | प्रतिनिधी**

रायगाव येथील एसटी बस अपघातात जखमी झालेल्या रुग्णांची विचारपूस करण्यासाठी करमाळा येथील उपजिल्हा रुग्णालयात राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हा सरचिटणीस अंगद देवकते यांनी सहकाऱ्यांसोबत भेट दिली. यावेळी त्यांनी अपघातात जखमी झालेल्या रुग्णांची परिस्थिती जाणून घेतली.
रुग्णांच्या नातेवाईकांनी करमाळा आगारातील एसटी बसेसच्या खराब स्थितीबद्दल तक्रार केली. या बसेस भंगार अवस्थेत असून, त्यात प्रवास करणाऱ्यांना अपघाताचा धोका भेडसावत आहे. अनेक वेळा विविध वृत्तपत्रांमध्ये करमाळा एसटी डेपोतील बसेसची स्थिती उघड करण्यात आली होती, पण अद्यापही परिस्थिती जसाची तशीच आहे. या घटनेने बसच्या खराब स्थितीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.



आजच्या रायगाव बस दुर्घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, २३ प्रवासी किरकोळ जखमी झाले असून, पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना करमाळा कुटीर रुग्णालयात उपचार दिले जात आहेत. अपघाताच्या माहिती मिळताच, अंगद देवकते यांनी आपले सहकारी बाळासाहेब टकले, अनिल तेली, विकास मेरगळ, सुरेश जाधव यांच्यासोबत रुग्णांना भेट दिली.
रुग्णांना सध्या पाणी व जेवण दिले जात नसल्याची माहिती मिळाल्यावर संबंधित नर्सला विचारले गेले, आणि अर्ध्या तासातच रुग्णांना जेवण व फिल्टर पाणी उपलब्ध करून देण्यात आले. संबंधित एसटी कर्मचारी यांनी सांगितले की, रुग्णांच्या पुढील उपचारासाठी शासन स्तरावरून आर्थिक मदत दिली जाईल.

# बगर महसूली गावातील बोगस पीकविमा प्रकरणी कारवाईची मागणी

## किसान सभेचे तहसीलदार गंगाखेड यांना निवेदन

**गंगाखेड | प्रतिनिधी**

परभणी जिल्ह्यातील १७ बगर महसूली गावांमध्ये बोगस पीकविमा घोटाळा उघड झाला असून, गंगाखेड तालुक्यातील आनंदनगर गावाचा यात समावेश आहे. किसान सभेच्या वतीने तहसीलदार गंगाखेड यांना दिलेल्या निवेदनात या प्रकरणी आयसीआयसीआय लोंबार्ड पीकविमा कंपनीसह संबंधितांवर फौजदारी कलमान्वये गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.
आनंदनगर गावामध्ये ५२४८.९९ हेक्टर क्षेत्रासाठी आयसीआयसीआय लोंबार्ड पीकविमा कंपनीकडे पीकविमा उतरवला गेला. यासाठी राज्याचा हिस्सा ४ कोटी ५९ लाख ९२ हजार ८२३.०१ व केंद्राचा हिस्सा ४ कोटी २ लाख ९ हजार ३४२.९९ असा एकूण ८ कोटी ६२ लाख २ हजार १६६ भरला गेला. तथापि, फसवणुकीच्या प्रकारात बोगस कागदपत्रांच्या आधारे हा विमा उतरवण्यात आला असल्याचे उघड झाले आहे. CSC सेंटरमार्फत बोगस सातबारा तयार करून विमा उतरवला गेला. परिणामी, शेतकऱ्यांच्या मंजूर पीकविमा रकमेत मोठ्या प्रमाणात कपात झाली. यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे.
शासन निर्णय दिनांक २६ जून २०२३ नुसार अशा प्रकारच्या फसवणुकीत फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश असतानाही आयसीआयसीआय लोंबार्ड कंपनीने अद्याप कोणतीही कारवाई केलेली नाही. याप्रकरणी कंपनी, बोगस विमाधारक व संबंधित CSC सेंटरच्या विरोधात गुन्हा दाखल करून शेतकऱ्यांना न्याय मिळावा, अशी मागणी किसान सभेच्या वतीने करण्यात आली आहे.कॉ. ओंकार पवार, लक्ष्मणसिंह चंदेल, चंद्रकांत जाधव यांनी या निवेदनावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

# मातोश्री हॉस्पीटलच्या वतीने महाआरोग्य शिबीराचे आयोजन

**बीड (प्रतिनिधी):** मातोश्री हॉस्पिटल बीड व रोटरी क्लब ऑफ बीड यांच्या संयुक्त विद्यमानाणे महाआरोग्य शिबिराचे आयोजन बीडमधील प्रसिद्ध मातोश्री मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल येथे मा. आ. सुनील दादा धांडे व मा. कल्याण दाजी पिंगळे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये
गरोदर मातांची मोफत सोनोग्राफी, ई.सी.जी. व रक्तदाब तपासणी , हिमोग्लोबिन व शुगरची तपासणी, इत्यादी तपासण्या मोफत करण्यात येणार आहेत व गरजू रुग्णांना महात्मा फुले व प्रधानमंत्री जनआरोग्य योजने अंतर्गत मोफत उपचार सुधा करण्यात येणार आहे. तसेच या हॉस्पिटल मध्ये मोफत डायलेसिस व किडनी उपचार, मोफत किडनी स्टोन व प्रोस्टेट ऑपरेशन, मोफत हाडांचे फ्रॅक्चर व मणक्याचे ऑपरेशन या सुविधा महात्मा फुले व प्रधानमंत्री जनआरोग्य योजने अंतर्गत उपलब्ध आहेत. डॉ अमोल जोगदंड व डॉ मीनल जोगदंड यांची मागील दहा वर्षाची मेहनत व अनुभव यामुळे मातोश्री मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल हे बीडमधील नामांकित हॉस्पिटल म्हणून उदयास आले आहे. रुग्णांना मिळणाऱ्या अ वगदर्जाच्या सुविधा योग्य दरात मिळणे ही एक पर्वणीच आहे. बीडमधील रुग्णांनी या महाआरोग्य शिबिराचा लाभ घेवून संधीचे सोने करावे अशे आव्हाहन मातोश्री हॉस्पिटल व रोटरी क्लब ऑफ बीड तर्फे करण्यात येत आहे.

# स्मशानभूमीतील अतिक्रमण थांबवा; समाज बांधवांचे उपोषण



**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

कोरेगाव ता. कर्जत येथील वीरशैव लिंगायत समाजाच्या स्मशानभूमीत होणाऱ्या अतिक्रमणाच्या विरोधात कर्जत तालुका वीरशैव लिंगायत समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी कर्जत तहसील कार्यालयात उपोषण केले. समाजाच्या स्मशानभूमीतील अतिक्रमण तातडीने थांबवून ती जागा समाजाच्या कायमस्वरूपी नावावर करण्यात यावी, अशी त्यांची प्रमुख मागणी होती. उपोषणात बापू शेळके, नीलकंठ शेळके, कांतीलाल वाघ, बापू कोरे, हनुमंत शेळके, प्रवीण पखाले, सर्वेश पखाले, शुभम पखाले, कार्तिक पखाले, अक्षय कोरे, ऋषीकेश शेटे, पांडुरंग शेटे, संकेत शेटे, गणेश पखाले, उमेश पखाले, अमोल कोरे यासह इतर समाज बांधव सहभागी झाले होते. तहसीलदार गुरू बिराजदार यांनी दोन्ही पक्षांची बैठक घेत समस्या समजून घेतली आणि त्यानंतर उपोषण स्थगित करण्यात यश मिळवले. तहसीलदार यांनी संबंधित दोन्ही पक्षांना सूचना देत, अतिक्रमणावर योग्य उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. समाजाचे सदस्य आगामी काळात यासंदर्भात तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा देत आहेत.

# कोरेगाव भीमा येथे विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी कडेकोट बंदोबस्ताचे नियोजन

**शिरूर | रमेश बनसोडे**

कोरेगाव भीमा येथे ३१ डिसेंबर रोजी होणाऱ्या विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. राज्यातील आणि बाहेरील अनुयायांच्या मोठ्या गर्दीचा अंदाज लक्षात घेऊन सुमारे ६००० ते ८००० पोलिस कर्मचारी तैनात करण्यात येणार आहेत.



गर्दी नियंत्रणासाठी आणि सोहळा सुरळीत पार पाडण्यासाठी ३३६ पोलीस अधिकारी, ३०८० पोलीस कर्मचारी, १५०० गृहरक्षक दलाचे जवान, आणि डठझऋ च्या १२ तुकड्या तैनात असतील. अग्निशमन दल व वैद्यकीय तज्ञांचे पथकही तत्पर राहील.
घातपात टाळण्यासाठी विशेष पथके तैनात राहतील. गर्दीचे नियोजन व अनुयायांच्या सुरक्षिततेसाठी पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी नियोजन केले असून, अतिरिक्त पोलीस अधीक्षक रमेश चोपडे यांचीही उपस्थिती आहे. आनंदमय सोहळ्यासाठी कोणत्याही प्रकारचा अडथळा येऊ नये म्हणून त्वरित वैद्यकीय सुविधा पुरवण्यासाठी तज्ञांचे पथक कार्यरत असेल. सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी प्रशासनाने विशेष उपाययोजना केल्या असून, अनुयायांनी प्रशासनाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

### वाहतूक आणि पार्किंग व्यवस्था

मोठ्या प्रमाणावर अनुयायी येण्याची शक्यता असल्याने वाहतूक सुरळीत राहण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे.

**चाकण रस्ता:** २३ एकर जागेवर पार्किंग व्यवस्था, ८०० वाहने सामावू शकतील.

**नगर रस्ता:** शिक्रापूर येथे ५९ एकर जागेवर ८००० वाहनांसाठी जागा उपलब्ध.

**झचझ बस सेवा:** शिक्रापूर परिसरातून वढू बुद्रुक व इनामदार पार्किंगपर्यंत बस सेवा.

# भुरट्या चोरांचा सुळसुळाट; फुलवळ येथे घरातून ४८ हजाराचा ऐवज पळविला!

**कंधार | प्रतिनिधी**

कंधार तालुक्यातील फुलवळ येथे दि.२७ ते २८ डिसेंबरचे रात्री १ ते ५ वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी घरातील दाराचे कडी तोडून जवळपास ४८ हजार रुपयांचा ऐवज पळवीला आहे. त्यामुळे फुलवळ येथे दहशतीचे वातावरण पसरले आहे.

दि.२७ ते २८ डिसेंबरचे रात्री १ ते ५ वाजताचे सुमारास फुलवळ येथीतील किशन पुंडलिक गडंबे यांचे घरातील २ लोखंडी पेट्या कुलूप बंद असलेल्या अज्ञात चोरट्याने उचलून नेऊन त्या घरापासून अंदाजे ४०० मीटर अंतरावरील लक्ष्मण बाबाराव मंगनाळे यांचे हळदीचे शेतात नेऊन पेटीमध्ये असलेल्या ५ ग्रॅम वजनाच्या ३ अंगठ्या, मनी – मंगळसूत्र, कानातील झुमके व नगदी सहा हजार रुपये असा ऐवज काढून घेऊन पेटीमधील महत्त्वाची कागदपत्रे अस्ताव्यस्त फेकून अज्ञात चोरट्याने पलायण केले आहे.




सदरील घटनेची माहिती मिळताच कंधार पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरीक्षक सुधाकर खजे, बीट जमादार संतोष काळे व त्यांच्या टीमने घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला आहे.सुधाकर किशन गडंबे वय ४५ वर्षे यांनी कंधार पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध कलम ३३१(४), ३०५ भारतीय न्याय संहिता प्रमाणे दाखल करून, पुढील तपास प्रभारी पोलीस निरीक्षक सुधाकर खजे यांचे मार्गदर्शनाखाली बीट जमादार संतोष काळे हे करत आहेत.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .